**अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांची नवीन संस्था सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. टिइएम २००७/(४१०/०७)/तांशि-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १ ऑक्टोबर, २००७.

संदर्भ : अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली याची पत्र
१) क्र.०६/०७/एमएस/फार्म/२००५-०६ दि.९.८.२००७
२) क्र.०६/०७/एमएस/फार्म/०४१ दि.९.८.२००७
३) क्र.०७/०८/एमएस/फार्म/२००७/००७_IV दि.९.८.२००७
४) क्र.०७/०८/एमएस/फार्म/२००७/००७_V दि.१३.९.२००७
५) क्र.७४०-८९-१३७ (पी)/इटी/९६

**शासन निर्णय :** अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधिन पत्रान्वये खालील संस्थांना शैक्षणिक वर्ष २००७-०८ करिता औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची संस्था / नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता दिली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता (२००८-२००९) |
|---|---|---|---|
| १ | गौरीशंकर एज्युकेशनल अॅण्ड चॅरिटेबल ट्रस्टचे गौरीशंकर इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल अॅण्ड एज्युकेशन अॅण्ड रिसर्च, सर्व्हे नं. ९९०, पो. लिंब, ता. जि. सातारा. | औषधनिर्माणशास्त्र | ६० |
| २ | मेरुलिंग शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ फार्मसी, मु. जवळवाडी, पो. मेढा, ता. जावळी, जि. सातारा. | औषधनिर्माणशास्त्र | ६० |
| ३ | गेनबा एज्युकेशन ट्रस्टचे गेनबा सोपानराव मोझे कॉलेज ऑफ फार्मसी, गट नं. २१८१, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे. | औषधनिर्माणशास्त्र | ६० |
| ४ | गुरुदत्त शिक्षण संस्थेचे लोकनेते डॉ. जे.डी. पवार कॉलेज ऑफ फार्मसी, मनूर, ता.कळवण, जि. नाशिक | औषधनिर्माणशास्त्र | ६० |
| ५ | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद. | बी. फार्म. | ४०-६० |
| | | एम.फार्म. (फार्मास्युटिकल केमिस्ट्री) | १८ |
| ६ | मौलाना आझाद एज्युकेशन ट्रस्टचे वाय. बी. चव्हाण कॉलेज ऑफ फार्मसी, पो. बॉ. नं. ६५, रोझा बाग, औरंगाबाद. | एम.फार्म. (फार्मास्युटिक्स) | १० |

Principal

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | धुळे चॅरिटेबल सोसायटीचे अण्णासाहेब रमेश अजमेरा कॉलेज ऑफ फार्मसी, धामणगांव रोड, देवपूर, धुळे | M.Pharm (Pharmacognosy) | १० |

२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने सदर मान्यता सन २००७-२००८ या शैक्षणिक वर्षाकरिता दिलेली आहे. मात्र सदर मान्यता दि. ३० जून, २००७ नंतर प्राप्त झाली असल्याने व अशा प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. ३९१६/२००१ प्रकरणी दिनांक १७.९.२००१ रोजी दिलेल्या आदेशानुसार या शासन निर्णयान्वये वरील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार विद्यार्थी प्रवेशक्षमतेस शैक्षणिक वर्ष २००८-०९ करिता औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था / नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

(१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच, दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

(२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

(३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतुदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

(४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण यांच्याकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

(५) औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाने/संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी अॅक्ट, १९४८ च्या कलम १२ मधील तरतुदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

(६) सदर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/ पध्दतीनुसार करण्यात येतील.

(७) संचालक , तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे / नाशिक.
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
संबंधित संस्था (संचालकांमार्फत.)

**प्रत माहितीसाठी :-**
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००२.
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्य बळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डिंग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई.
निवडनस्ती/तांशि-१

C:\Documents and Settings\DIT\My Documents\BABA\G.R\After 30th June.doc

Principal
A.R.A.College of Pharmacy
NAGAON, Dhule